ISO 9001:2015

# Certificate of Registration

This is to certify that the Quality Management System of

**DR. BABASAHEB AMBEDKAR RESEARCH AND TRAINING INSTITUTE**

28 QUEENS GARDEN, NEAR OLD CIRCUIT HOUSE, PUNE, MAHARASHTRA – 411001, INDIA

has been independently assessed by PQC and found to comply with the requirements of

## (Quality Management System) ISO 9001:2015

### For the following scope:

- **DEVELOPMENT OF THE SYSTEM: ASSESSMENT AUDIT, COLLECTION OF DOCUMENTS, GAP ANALYSIS AND BUSINESS STRATEGY.**
- **IMPLEMENTATION OF THE SYSTEM: DOCUMENTS AND RECORD KEEPING TRAINING, SKILL DEVELOPMENT, E-DEVELOPED BUSINESS STRATEGY.**
- **AUDIT: MANAGEMENT REVIEW MEETING, HANDING OVER THE DOCUMENTS, CERTIFICATION AUDIT, ASSISTANCE IN CLOSING NCS.**

### Certification Calendar:

Client Id: 11711

Certificate No: INQ/MH-11588/0123

Initial Registered Date: 28.01.2023 Issuance Date: 28.01.2023

Date of Expiry: 27.01.2026

1st Surv. Due: 27.01.2024 2nd Surv. Due: 27.01.2025

ACCREDITED
Management System Certification

Authorized Signatory

**PARAMOUNT QUALITY CERTIFICATIONS**

27, Old Gloucester Street, London, WC1N 3AX, United Kingdom. Email:- info@pqcert.in

Validity of this certificate is subject to successful completion of surveillance audit on or before of due date.
(In case surveillance audit is not allowed to be conducted, this certificate shall be suspended/withdrawal.)
Certification Verification: Please check this validity of the certificate at:- https://pqcert.in/certified-clients/ or www.pqcert.in at Certified Client
This Certificate remains the property of PQC & shall be returned immediately upon request.

www.pqcert.in

# महाराष्ट्राची भूमी

**महाराष्ट्र MAG/SR/03/2021 MAHMAR/51177**

दि.१०/०५/२०२३ ते १६/०५/२०२३. मुख्य संपादक:- आनंदा बारवकर ऑफिस नं:- ०२११९-२२४५४५


# बार्टी संस्था ISO ने सन्मानित



शिरूर प्रतिनिधी, विजय कांबळे:डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थेला नुकतेच ISO आंतरराष्ट्रीय मानक यांचे प्रमाणपत्र मिळाले आहे.या संस्थेने गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली ९००/२०१५ अंतर्गत प्रणालिचा विकास मुल्यांकन तपासणी , कागदपत्रे पडताळणीविश्लेषण, पुनर्रचना विकास व त्यांला लागणारे कागदपत्रे साहित्य प्रशिक्षण कौशल्य विकास व्यवस्थापन यांची पडताळणी उत्तम रित्या पार पाडली व संस्थेचे कामकाज आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केल्याबदल आंतरराष्ट्रीय मानक संस्थेने बार्टी संस्थेला ISO ने सन्मानित केले.प्रमाणपत्र क्रमांकINQLMH-११५८८/०१२३ हा आहे.या संस्थेची सर्व पडताळणी आंतरराष्ट्रीय मानक संस्थेचे कार्यरत असलेले पॅरामाऊट गुणवत्ता प्रमाणपत्र या संस्थेने केले व या संस्थेने बार्टी या संस्थेस आंतरराष्ट्रीय मानक ISO प्रमाणपत्र बहाल केले.बार्टी हि संस्था अनुसुचित जातीच्या घटकांकरिता प्रशिक्षण व संशोधनाचे कार्य करत असते तसेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व ईतर महापुरुषांच्या सामाजिक समतेच्या विचारांचा भारतीय संविधानाचा प्रचार व प्रसार करते बार्टी या संस्थेची स्थापना २२ डिसेंबर १९७८ रोजी झाली असून या संस्थेला २००८मध्ये स्वायत्त संस्था म्हणून शासनाकडून मान्यता मिळाली आहे.या संस्थेने अनेक जातिचे संशोधन करून राज्य शासनास पाठवले आहे कौशल्य विकास यांचे प्रशिक्षण दिले युपीएससी, एमपीएससी स्पर्धा परीक्षांचे तसेच आयबीपीएस द्ववारे प्रशिक्षण देऊन प्रशासनात पाठविले संशोधन करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवती (BANRF) एम. फिल व पीएचडी करणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली प्रकाशन व प्रसिद्धी विभागाद्वारे घर घर संविधान ही मोहीम राबविण्यात येत आहे "भीमराव ते बाबासाहेब " या महत्त्वाकांक्षी उपक्रमाद्वारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या मान्यवर व महापुरुषांचा इतिहास वेबसिरिजची निर्मिती करण्यात येत असुन मा. सचिव सामाजिक न्याय विभाग यांनी यासाठी तत्वता मान्यता दिली असून यांचा आराखडा तयार करुन तो पुढच्या BOG मध्ये ठेवण्यात येणार आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या मांतग परिषदेचे संकलन तसेच सत्यशोधक लहुजी वस्ताद साळवे, मुक्ता साळवे यांचे संशोधन करण्यात येत आहे.असुन मा महासंचालक सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत बार्टी संस्थेला ISO नामांकन मिळाल्याबदल मा महासंचालक यांनी बार्टीतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.ISO मानांकन बार्टी संस्थेच्या निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार यांनी मा महासंचालक सुनिल वारे यांना सुपूर्द केले आहे.यावेळी बार्टीचे सर्व विभागप्रमुख हजर होते.

पुढारी

# संक्षिप्त

## बार्टी संस्था आयएसओने सन्मानित

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थेला नुकतेच 'आयएसओ' हे आंतरराष्ट्रीय मानक प्रमाणपत्र मिळाले आहे. आयएसओ मानांकन बार्टी संस्थेच्या निबंधक इंदिरा अस्वार यांनी महासंचालक सुनील वारे यांना सुपूर्द केले. या संस्थेने गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली ९००/२०१५ अंतर्गत प्रणालीचा विकास मूल्यांकन तपासणी, कागदपत्रे पडताळणी, अंतर विश्लेषण, पुनर्रचना विकास व त्याला लागणारे कागदपत्रे, साहित्य प्रशिक्षण कौशल्य विकास व्यवस्थापन यांची पडताळणी उत्तमरीत्या पार पाडली. बार्टी संस्था अनुसूचित जातीच्या घटकांकरिता प्रशिक्षण व संशोधनाचे कार्य करीत असते. तसेच, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांच्या विचारांचा, भारतीय संविधानाचा प्रचार व प्रसार करते. बार्टीची स्थापना २२ डिसेंबर १९७८ रोजी झाली असून, २००८ मध्ये स्वायत्त संस्था म्हणून शासनाकडून मान्यता मिळाली आहे.